क्र. पोमसं/४१/नाहसं/टे.नं.२/परिपत्रक/पोलीस
तपास बंद प्रकरणे/ ६ / २०८ /२०१८
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई – ४०० ००१.
दिनांक :– ०४/०६/२०१८.

## परिपत्रक

राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या सन २००८–०९ च्या ४ थ्या अहवालाच्या शिफारसीवर कार्यवाही होण्याच्या अनुषंगाने, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९ व सुधारणा अधिनियम, २०१५ आणि ना.ह.सं. कायदा, १९८९ या कायदयान्वये दाखल झालेल्या गुन्हयांची प्रभावी अंमलबजावणी होणेकामी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व घटक प्रमुख यांनी खालील मुदयावर योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती.

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९ व सुधारणा अधिनियम, २०१५ आणि ना.ह.सं. कायदा, १९५५ अन्वये दाखल झालेल्या गुन्हयांचा प्रत्येक तिमाहीस आढावा घ्यावा.

२) या कायदयान्वये तपासी अधिकारी यांनी पोलीस तपासावर बंद केलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन, कमीत कमी ५ प्रकरणांचे पुर्नविलोकन करतील व ज्या तपासी अधिकारी यांच्यामुळे प्रकरण बंद करण्यास उशिर झाला असेल, अशा तपासी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई सुरु करावी.

४/६/१८

( कैसर खालिद )
विशेष पोलीस महानिरीक्षक
नागरी हक्क संरक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह)
सर्व पोलीस अधिक्षक (रेल्वेसहित)

प्रत :–

सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक

9

क्र. पोमसं/४१/नाहसं/टे.नं.२/परिपत्रक/मध्यवर्ती संनियंत्रण समिती संरचना/ 360 /२०१८
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई – ४०० ००१.
दिनांक :– ०१/०९/२०१८.

## परिपत्रक

विषय:– अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) कायदा, १९८९ व सुधारीत अधिनियम, २०१५ मधील खटल्यामध्ये सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी, दोषारोप गुणवत्ता तपासणीकरीता स्थापन करण्यात आलेल्या मध्यवर्ती संनियंत्रण समितीमध्ये पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण यांना समाविष्ट करणेबाबत.

.............

पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद झाल्यानंतर, गुन्हयाचा तपास पुर्ण करुन, गुन्हयाच्या तपासात बऱ्याच त्रुटी ठेवून न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केल्यामुळे दोषसिध्दीच्या प्रमाणात घट झाल्याबाबत शासनाच्या निदर्शनास आल्याने, शासनाने शासन निर्णय क्रमांक डीपीपी–२०१२/प्र.क्र.१०/पोल–१०, मंत्रालय, मुंबई, दिनांक १२ मे, २०१५ अन्वये दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी, दोषारोपपत्राची गुणवत्ता तपासून घेणेकामी मध्यवर्ती संनियंत्रण समिती (Monitoring Committee) ची संरचना केली आहे.

अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ व सुधारणा अधिनियम २०१५ अन्वये दाखल झालेल्या गुन्हयांचे दोषसिध्दीचे प्रमाण हे अत्यल्प असल्याने तपासाची गुणवत्ता व दोषसिध्दी प्रमाण वाढविण्याकरीता नमुद कायदयान्वये दाखल झालेल्या गुन्हयांचे दोषारोपास मध्यवर्ती सनियंत्रण समितीकडून परवानगी देताना संबधित परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक ना.ह.सं. यांना विशेष निमंत्रित म्हणुन बोलवुन संबंधीत गुन्हयांबाबतचे दोषारोपास परवानगीबाबत त्यांचे मत घेण्यात यावे.

( कैसर खालिद ) १/९/१८
विशेष पोलीस महानिरीक्षक, ना.ह.सं.,
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरीता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह)
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)

प्रत :– सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक, ना.ह.सं., कोकण,नाशिक,कोल्हापूर,औरंगाबाद,नांदेड,अमरावती,नागपूर परिक्षेत्र.

क्र. पोमसं/४१/नाहसं/टे.नं.२/राज्यस्तरीय दक्षता व नियंत्रण समिती/४(क)(३)/ ११३ /२०१९
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई – ४०० ००१.
दिनांक :– १४ /०३/२०१९

## परिपत्रक

**विषय :– दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत.**

..........

उपरोक्त विषयास अनुसरुन, अ.जा./ज. (अ.प्र.) कायदा, १९८९ व ना.ह.सं. कायदा, १९५५ अन्वये दाखल झालेल्या गुन्हयांमध्ये दोषसिध्दीचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्व घटक प्रमुख यांनी तपासासंदर्भात तपासी अधिकारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्याबाबत विनंती आहे.

१) अ.जा./ज. (अ.प्र.) कायदा, १९८९ या गुन्हयाचा तपास अ.जा./ज. (अ.प्र.) नियम, १९९५ चे नियम ७ (१) अन्वये पोलीस उप अधिक्षक / उप विभागीय पोलीस अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांनीच करावा.

२) अ.जा./ज. (अ.प्र.) कायदा, १९८९ अन्वये गुन्हा दाखल झाल्यानंतर घटक प्रमुख यांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास अ.जा./ज. (अ.प्र.) नियम, १९९५ चे नियम ७ (१) अन्वये पोलीस उप अधिक्षक/उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी करण्याबाबत आदेश दयावेत.

३) गुन्हा दाखल होताना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी स्वत: जातीने लक्ष देवून गुन्हा दाखल करणाऱ्या अधिकाऱ्यास फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे फिर्याद नोंदविताना गुन्हा कोणत्या कारणावरुन, कोणत्या उद्देशाने घडला, आरोपी व फिर्यादीची जात, आरोपीत यांनी फिर्यादीस कोणती जातीवाचक शिवीगाळ केली ती तशीच्या तशी घेणे याचा उल्लेख करण्याबाबत व तक्रारदाराकडून तक्रार दाखल करण्यास उशिर झाला असल्यास, त्याबाबतचे समर्पक कारण प्रथम खबरीमध्ये नमूद करण्याबाबत व योग्य ती कलमे लावण्याबाबत मार्गदर्शन करतील.

४) गुन्हयाच्या घटनास्थळाचा पंचनामा करुन त्यासोबत घटनास्थळाचा नकाशा सक्षम प्राधिकरण यांचेकडून प्राप्त करुन गुन्हयाच्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट करावा.

५) फिर्यादी व आरोपीचे जातीची प्रमाणपत्रे लवकरात लवकर प्राप्त करुन गुन्हयाच्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट करावीत.

६) फिर्यादी, पिडीत व्यक्ती व गुन्हयातील आरोपींची वैद्यकीय तपासणी करुन अहवाल लवकरात लवकर प्राप्त करावा.

७) गुन्हयामध्ये जास्तीत जास्त प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व वैज्ञानिक पुरावा मिळविण्याचा प्रयत्न करावे.

८) दाखल गुन्हयामध्ये प्रतिष्ठित व जबाबदार व्यक्ती यांना पंच म्हणून घेण्यात यावे जेणेकरुन पंच फितूर झाल्यामुळे निर्दोष सुटलेल्या गुन्हयांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

९) फिर्यादी, पिडीत व्यक्ती व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे कलम १६४ फौ.दं.प्र.सं. अन्वये जबाब नोंद करण्यात यावेत.

..........२/–

१०) अ.जा./ज. (अ.प्र.) कायदयान्वये गुन्हे दाखल करताना आजही अ.जा./ज. (अ.प्र.) सुधारणा कायदा, २०१५ मधील कलमांचा योग्य तो वापर होत नसल्याबाबत शासनाने सूचित केले आहे. तरी, सर्व तपासी अधिकारी यांना अ.जा./ज. (अ.प्र.) सुधारणा कायदयामधील सुधारीत कलमांचा वापर करण्याबाबत सूचना दयाव्यात.

११) सदर कायदयाचे सखोल ज्ञान सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना होणेकामी कार्यशाळा/उजळणी वर्ग घेण्यात यावेत.

१२) या कायदयातंर्गत दाखल झालेल्या गंभीर गुन्हयामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करणेबाबत विधी व न्याय विभाग यांचेशी पत्रव्यवहार करावा.

१३) गुन्हयाचे दोषारोप पत्र न्यायालयात सादर करण्यापूर्वी सरकारी अभियोक्ता यांचेकडून कागदपत्रांची पडताळणी करुन घ्यावी व त्यांनी दिलेल्या त्रुटींची पूर्तता करुनच विहीत वेळेत न्यायालयामध्ये दोषारोप पत्र सादर करावे.

१४) फिर्यादी, साक्षीदार, पंच यांचे मनातील न्यायालयाविषयीचे भय कमी होणेकरीता Moot Court ची स्थापना करुन एखादया गुन्हयाची सुनावणी सुरु होणेपूर्वी Moot Court मध्ये फिर्यादी, साक्षीदार, पंच व तपासी अधिकारी यांचेकडून गुन्हयासंदर्भात सराव करुन घेण्यात यावा.

१५) अ.जा./ज. (अ.प्र.) कायदा, १९८९ व ना.ह.सं. कायदा, १९५५ अन्वये पोलीस तपासावर प्रलंबित असलेल्या गुन्हयांपैकी मा. न्यायालयाने ज्या गुन्हयामध्ये अपिल/याचिका दाखल करण्यात आलेली आहे. सदर अपिल/याचिकांच्या सुनावणीदरम्यान मा. न्यायालयाने तपासास स्थगिती आदेश दिलेले नाहीत. अशा सर्व गुन्हयांमध्ये तात्काळ दोषारोप पत्र न्यायालयात सादर करण्याबाबत तपासी अधिकारी यांना आदेशित करावे.

१६) पैरवी अधिकारी हे खटला सुनावणीच्या वेळी फिर्यादी, साक्षीदार व पंच यांना गुन्हयासंदर्भात मार्गदर्शन करतील.

१७) दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकामी शासनाने सन २०१५ मध्ये निर्गमित केलेले १४ शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करतील.

१८) निर्दोष सुटलेल्या खटल्यांच्या निर्णयांचा अभ्यास करुन गुन्हे सुटण्याची कारणमिमांसा तयार करावी व ज्या कारणांमुळे गुन्हे निर्दोष सुटले त्या कारणांची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये याची दक्षता घ्यावी.

13/3/19

( कैसर खालिद)
विशेष पोलीस महानिरीक्षक,
नागरी हक्क संरक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह)
२) सर्व पोलीस अधिक्षक (रेल्वेसह)
३) सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक.
४) पोलीस अधिक्षक,ना.ह.सं.,कोकण,नाशिक,कोल्हापूर,औरंगाबाद,नांदेड,अमरावती,नागपूर परिक्षेत्र.
५) पोलीस उप अधिक्षक, ना.ह.सं., मुंबई पथक, मुंबई.

क्र. पोमसं/४१/नाहसं/टे.नं२/शासन संदर्भ /५५/२०१९-२८८
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहिद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई-४०० ००१.
दिनांक :- ०५/०७/२०१९.

परिपत्रक

**विषय :-** अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ सह सुधारणा अधिनियम २०१५ अन्वये प्रथम खबर नोंदवून गुन्हा दाखल करतेवेळी फिर्यादी / पिडीत यांना जात प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती न करणेबाबत .

*******

अ.जा./ज.(अ.प्र.)कायदा १९८९ सह सुधारणा अधिनियम २०१५ व ना.ह.स. कायदा १९५५ अन्वये पोलीस ठाण्यामध्ये प्रथम खबर नोंदवून, गुन्हा दाखल करताना फिर्यादी / पिडीतास अधिकाऱ्यांकडुन जातीचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सांगितले जाते असे काही प्रकरणांमध्ये निदर्शनास आले आहे.

सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, अ.जा./ज. (अ.प्र.) कायदा १९८९ सह सुधारणा अधिनियम २०१५ व ना.ह.स. कायदा १९५५ अन्वये गुन्हा नोंद करताना फिर्यादी / पिडीत यांस जातीचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत सक्ती न करता, प्रथम गुन्हा नोंद करुन घ्यावा आणि नंतर सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान फिर्यादीकडुन जात प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व पुढील कार्यवाही करावी.

**( कैसर खालिद )** ५/७/१९
विशेष पोलिस महानिरीक्षक,
नागरी हक्क संरक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (रेल्वेसह)
सर्व पोलीस अधिक्षक (रेल्वेसह)

प्रत,

सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक,
पोलीस अधिक्षक, नाहसं, कोकण, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, अमरवती, नागपूर, परिक्षेत्र व पोलीस उप अधीक्षक, मुंबई पथक.